RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ३८] शुक्रवार, मार्च २०, २०२६/फाल्गुन २९, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १४१**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सामान्य प्रशासन विभाग/मातं

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मार्च २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक UCD-१७२५/C.R.३५५/IT.– ज्याअर्थी, ओळख पटविण्याकरिता आधार क्रमांकाच्या वापरामुळे, व्यक्तींना सोयीस्कर व अखंडपणे सेवा, लाभ व अर्थसहाय्य प्राप्त होणे शक्य होते; ओळख पटविण्यासाठी अनेक कागदपत्रांची आवश्यकता राहत नाही, प्रक्रिया सुलभ होतात आणि पारदर्शकता व कार्यक्षमता वाढते;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाशी (UIDAI) सल्लामसलत करून, त्यांच्या दि. ३ फेब्रुवारी, २०२५ आणि दि. २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीचे पत्र क्रमांक १३(४)/२०२०-EG-II (Vol.-V) अन्वये, सुशासनासाठी (सामाजिक कल्याण, नवोपक्रम, ज्ञान) आधार प्रमाणीकरण नियम, २०२० (यात यापुढे ज्याचा निर्देश, उक्त नियम असा करण्यात आला आहे) याच्या नियम ३ च्या पोट-नियम (१) अन्वये विहित केलेल्या प्रयोजनांसाठी, माहिती तंत्रज्ञान विभाग, सामान्य प्रशासन विभाग (यात यापुढे ज्याचा निर्देश, उक्त विभाग असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र शासन (यात यापुढे ज्याचा निर्देश, उक्त शासन असा करण्यात आला आहे) यास, आधार प्रमाणीकरण करण्यास आणि प्रमाणीकरण करताना आधार क्रमांक धारकाची ओळख पटविण्यासाठी आधार क्रमांकाचा वापर करण्यास परवानगी दिली आहे आणि सदर बाब उक्त नियमांच्या नियम ५ तसेच आधार (आर्थिक व इतर अर्थसहाय्य, लाभ व सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्या उपखंड (दोन) अन्वये ते अधिसूचित करण्याची परवानगी दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, महासारथी (MahaSarathi) पोर्टलवर नोंदणी करताना व्यक्तींची ओळख पडताळण्यासाठी आणि युनिक आयडी (म्हणजेच, महा आयडी) तयार करण्यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश, उक्त प्रयोजन असा केला आहे), उक्त नियमांच्या नियम ३ च्या पोट-नियम (१) अन्वये विहित केल्याप्रमाणे, " होय/नाही " याचा, किंवा/आणि ई-केवायसी (e-KYC) प्रमाणीकरण सुविधेद्वारे आधार प्रमाणीकरण हे ऐच्छिक आधारावर करण्यात येईल आणि उक्त प्रयोजनासाठी आधार प्रमाणीकरण करणे ऐच्छिक असेल आणि उक्त विभागाकडून केवळ योजनांचे व सेवांचे डिजिटल वितरण करणे सुलभ होण्याकरिता आणि राज्यातील विभागांना योजनांचे किंवा सेवांचे (यात यापुढे ज्याचा निर्देश, वापर प्रकरणे असा करण्यात आला आहे) नियोजन करण्यास व त्यांची अंमलबजावणी करण्यास मदत होण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील नागरिकांसाठी " प्रमाणित नोंदी " तयार करण्यासाठी आधार प्रमाणीकरण करण्यात येईल.

त्याअर्थी, आता, उक्त नियमांच्या नियम ५ अन्वये तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्या उपखंड (दोन) या अन्वये, उक्त विभागाद्वारे, पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :–

१. (१) उक्त अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे, माहिती तंत्रज्ञान विभाग, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, सदर प्रमाणीकरण करण्याच्या प्रयोजनासाठी आधार क्रमांक धारकाची संमती प्राप्त करून घेईल.

(२) उक्त नियमांच्या नियम ३ च्या पोट-नियम (२) नुसार, आधार प्रमाणीकरण ऐच्छिक असल्याने, आधार क्रमांक धारकास ओळख पडताळणीसाठी पर्यायी व व्यवहार्य साधनांची माहिती देण्यात येईल आणि आधार प्रमाणीकरणास नकार दिल्यास किंवा प्रमाणीकरण करण्यास असमर्थ असल्यास, कोणतीही सेवा नाकारण्यात येणार नाही. त्यासाठी खालीलपैकी कोणतेही पर्यायी साधन वापरता येईल,

(अ) सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) अंतर्गत दिलेल्या शिधापत्रिकेद्वारे पडताळणी; किंवा

(ब) परिवहन विभागाने दिलेल्या वाहनचालक परवाना क्रमांकाद्वारे पडताळणी; किंवा

(क) आयकर विभागाने दिलेल्या पॅन क्रमांकाद्वारे पडताळणी; किंवा

(ड) भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार ओळखपत्राद्वारे पडताळणी; किंवा

(इ) शिक्षण मंत्रालयाने दिलेल्या अपार (APAAR) ओळखपत्राद्वारे पडताळणी; किंवा

(फ) राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने (NHA) दिलेल्या आभा (ABHA) ओळखपत्राद्वारे पडताळणी.

२. ही अधिसूचना, ती **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विरेंद्र सिंह,**
शासनाचे सचिव (माहिती तंत्रज्ञान).

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT (IT)

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 20th March 2026.

*NOTIFICATION*

No.UCD-1725/C.R.355/IT.– Whereas the use of Aadhaar number to establish identity enables individuals to receive subsidies, benefits and services in a convenient and seamless manner, obviates the need for multiplicity of documents to establish identity, simplifies processes and promotes transparency and efficiency ;

And whereas the Ministry of Electronics and Information Technology, Government of India, after consultation with the Unique Identification Authority of India (UIDAI), had allowed *vide* its letter No. 13(4)/2020-EG-II (Vol.-V) dated the 3rd February 2025 and 26th February 2026 to the Department of Information Technology, General Administration Department (hereinafter referred to as the said Department), Government of Maharashtra (hereinafter referred to as the said Government) for the purposes prescribed under sub-rule (1) of rule 3 of the Aadhaar Authentication for Good Governance (Social Welfare, Innovation, Knowledge) Rules, 2020 (hereinafter referred to as the said rules) that the said Department, of said Government may be allowed to perform authentication and be permitted the use of Aadhaar number during authentication for establishing identity of Aadhaar number holder and to notify the same under rule 5 of the said rules read with sub-clause (*ii*) of clause (*b*) of sub-section (*4*) of section 4 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (hereinafter referred to as the said Act) ;

And whereas, the Aadhaar authentication shall be performed on Voluntary basis, to verify identity of individuals during registration on MahaSarthi portal and generation of Unique ID *(i.e.* MAHA ID), using Yes/No, or/and eKYC authentication facilities (hereinafter referred to as the said purpose) as prescribed under sub-rule (1) of rule 3 of the said rules and the performance of Aadhaar authentication for the said purpose shall be on voluntary basis and that the said Department, of said Government shall perform the Aadhaar authentication only for creation of a "Authenticated Record" for citizen of Maharashtra to facilitate the digital delivery of Schemes and Services and aid Departments of the State to plan and execute schemes or services (hereinafter referred to as the use case(s)) ;

Now, therefore, in pursuance of rule 5 of the said rules read with sub-clause (*ii*) of clause (b) of sub-section (*4*) of section 4 of the said Act, the said department of said Government hereby notifies the following, namely.—

1. (*1*) Aforesaid Department, of said Government as provided in the Act, shall obtain the consent of the Aadhaar number holder for the purpose of authentication herein.

(*2*) As per sub-rule (2) of rule 3 of the said rules, Aadhaar authentication is on voluntary basis, the said Department, of said Government shall inform to the Aadhaar number holder of alternate and viable means of identification and shall not deny any service to the Aadhaar number holder for refusing to, or being unable to, undergo Aadhaar authentication, namely :–

(*a*) Validation through Ration Card issued by Public Distribution System (PDS) ; or

(*b*) Validation through Driving License Number issued by Transport Department ; or

(*c*) Validation through PAN issued by Income Tax Department ; or

(*d*) Validation through Voter ID issued by Election Commission of India; or

(*e*) Validation through APAAR ID issued by Ministry of Education ; or

(*f*) Validation through ABHA ID issued by National Health Authority (NHA).

2. This notification shall come into effect from the date of its publication in the *official Gazette*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIRENDRA SINGH,
Secretary (IT) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.